ePaper

वर्ष - 9 । अंक -145 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

www.mahaenews.com । रविवार, दि. 18 जानेवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## काँग्रेसमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर, भाई जगताप यांना कारणे दाखवा नोटीस




### आतील पानांत

- बांगलादेशच्या जबड्यातून विजय
- वैभव सूर्यवंशीचा वर्ल्ड रेकॉर्ड
- ट्रम्प यांचा टॅरिफ बॉम्ब युरोपियन देशांवर
- इंडिगोला DGCA चा दणका


### पुणे महापालिका निवडणूक निकाल : 'स्वबळा'चा नारा शिवसेनेसाठी ठरला फसवा

# शिंदेंचा भ्रमाचा भोपळा फुटला!

## पुण्यात शून्यावर आऊट; पुण्यात शिवसैनिकांचा सर्व जागांवर पराभव



। पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुण्याच्या राजकारणात 'किंगमेकर' होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला महापालिका निवडणुकीत मोठा धक्का बसला आहे. भाजपच्या साथीने सत्तेत सहभागी असतानाही पुण्यात एकही जागा जिंकता न आल्याने शिवसेना (शिंदे गट) अक्षरशः नामोहरम झाल्याचे चित्र आहे. ११९ उमेदवार स्वबळावर रिंगणात उतरवूनही सर्वच जागांवर पराभव स्वीकारावा लागल्याने 'स्वबळाचा प्रयोग' पुण्यात पूर्णपणे अपयशी ठरल्याचे स्पष्ट झाले आहे.**

महापालिका निवडणुकांचे बिगुल वाजताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महायुतीची औपचारिक घोषणा केली होती. पुणे महापालिका निवडणूक एकत्र लढवण्याचा निर्णय शहर पातळीवरील बैठकीतही झाला होता. शिवसेनेची पुण्यातील मर्यादित ताकद लक्षात घेता भाजपने तब्बल १६५ पैकी १५ ते १६ जागा सोडण्याची तयारी दाखवली होती. मात्र शिवसेनेने २५ जागांची मागणी लावून धरल्याने जागावाटपाचा तिढा वाढतच गेला.

भाजपने 'इलेक्टिव्ह मेरिट'चा मुद्दा पुढे करत जास्त जागा देण्यास ठाम नकार दिला, तर शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी 'सन्मानजनक वाटा' मिळत नसल्याचा सूर आळवला. परिणामी शेवटपर्यंत महायुतीतील जागावाटप ठरू शकले नाही. उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम मुदत जवळ येताच शिवसेनेने अचानक एबी फॉर्म वाटून ११९ उमेदवार निवडणुकीत उतरवले आणि स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला.

याच काळात मंत्री उदय सामंत यांच्याकडून 'महायुती अभेद्य आहे' असे दावे केले जात असताना, स्थानिक पातळीवरील शिवसेनेचे पदाधिकारी मात्र राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर जाण्याची चाचपणी करत असल्याची चर्चा होती. अखेरीस शिवसेनेने पुण्यातील ४१ पैकी ३९ प्रभागांत उमेदवार दिले. त्यापैकी १५ प्रभागांत संपूर्ण पॅनेल उभे करण्यात आले. मात्र आकड्यांची ही आक्रमक मांडणी मतांमध्ये रुपांतरित झाली नाही.

निवडणूक प्रचारात शिवसेनेने पुण्याच्या सर्वांगीण विकासाचा मुद्दा पुढे केला. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना सुरू केलेली 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना ही प्रचाराची मुख्य धुरा ठरली. या योजनेच्या माध्यमातून आर्थिक लाभ मतदारांना आकर्षित करेल, अशी सेनेची अपेक्षा होती. मात्र पुणेकरांनी या योजनेला अपेक्षित प्रतिसाद दिला नाही.

विशेष म्हणजे, शिवसेनेच्या प्रचारात आक्रमकतेचा अभाव ठळकपणे जाणवला. भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसवर थेट टीका टाळण्यात आली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कात्रज आणि नाना पेठेत सभा घेतल्या. 'पुणे शहर गुन्हेगारीमुक्त, भ्रष्टाचारमुक्त, झोपडपट्टीमुक्त आणि वाहतूक कोंडीमुक्त करू', अशी आश्वासने देण्यात आली. 'पाण्याचे मीटर काढून फेकून देऊ'सारख्या घोषणाही करण्यात आल्या. मात्र या घोषणा पुणेकरांच्या मनाला भिडू शकल्या नाहीत.

मंत्री उदय सामंत, नेत्या नीलम गोऱ्हे, मंत्री गुलाबराव पाटील यांनीही प्रचारसभांचा धडाका लावला. तरीही मतपेटीतून 'धनुष्यबाणा'ला पाठबळ मिळाले नाही. 'लाडकी बहीण' योजनेचा करिष्मा पुण्यात चालला नाही. आर्थिक लाभापेक्षा पुण्याची राजकीय समज स्थानिक नेतृत्व, विश्वासार्हता आणि मजबूत संघटन रचनेवर अवलंबून असल्याचे या निकालातून स्पष्ट झाले.

या मानहानीकारक पराभवानंतर शिवसेनेच्या शहर नेतृत्वात मोठे बदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुण्यातील संघटनात्मक फेररचना करतील का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. मात्र पुणेकरांनी दिलेला स्पष्ट संदेश शिवसेनेसाठी आत्मपरीक्षणाची गरज अधोरेखित करणारा ठरला आहे.

### पराभवाची ठळक कारणे

शिवसेनेच्या पराभवामागे पक्षांतर्गत धुसफूस हे प्रमुख कारण ठरले. तिकीट वाटपावरून निष्ठावंत कार्यकर्त्यांनी थेट पदाधिकाऱ्यांच्या घराबाहेर आंदोलने केली. पक्षाच्या बैठकीत झालेली भांडणे चव्हाट्यावर आली. प्रचारातही पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये समन्वयाचा अभाव दिसून आला.

या अंतर्गत संघर्षाचा फटका थेट निकालात दिसला. पक्षाचे शहरप्रमुख प्रमोद उर्फ नाना भानगिरे यांना स्वतःची जागा वाचवता आली नाही. महानगरप्रमुख रवींद्र धंगेकर यांच्या पत्नी प्रतिभा आणि चिरंजीव प्रणव धंगेकर यांनाही पराभवाचा सामना करावा लागला. निवडणुकीच्या तोंडावर धनुष्यबाण हाती घेतलेल्या आबा बागूल यांना तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. एकंदरीतच पुण्याचा 'कारभारी' बदलण्याच्या उद्देशाने उतरलेल्या शिवसेनेला पुणेकरांनी 'पाहुण्या'सारखी वागणूक दिली. शहराच्या राजकारणात संघटन, सातत्य आणि स्थानिक नेतृत्व किती महत्त्वाचे आहे, हे या निकालाने पुन्हा एकदा अधोरेखित केले.

## राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण राज्यात आणि केंद्रात काही बदल दिसतील

# दोन्ही पवार कुटुंब पुन्हा एकत्र येणार!

## अजित पवार काय म्हणाले?



।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील २९ महानगरपालिका निवडणुकीचा निकाल १६ जानेवारी रोजी जाहीर झाला. या निवडणुकीत पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये दोन्ही राष्ट्रवादीला मोठा धक्का बसला. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेत सत्ता काबीज करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) एकत्र आले होते. मात्र, दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येऊन निवडणूक लढवल्यानंतरही पराभवाला सामोरं जावं लागलं.**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेत आलेल्या अपयशानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज अचानक बारामतीत शरद पवार यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली. महानगरपालिकांचा निकाल जाहीर झाल्यानंतर अजित पवारांनी अचानक शरद पवारांची भेट घेतल्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. दरम्यान, या भेटीबाबत पत्रकारांनी पत्रकार परिषदेत प्रश्न विचारला असता अजित पवारांनी भेटीचं कारण देखील सांगितलं. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार का? आज बैठक झाल्याची चर्चा सुरू आहे, असा प्रश्न पत्रकारांनी अजित पवारांना विचारला. यावर बोलताना अजित पवार म्हणाले की, “अशी कोणतीही बैठक झाली नाही. मी आता कृषीच्या विषयांवर बोलत आहे. आता तुम्ही जो प्रश्न विचारला, त्याचं उत्तर असं आहे की, आज कृषीक २०२६ चं उद्घाटन होतं. त्या कार्यक्रमासाठी कुलगुरू येणार होते, मी येथील लोकप्रतिनिधी आहे, त्यामुळे मी देखील कार्यक्रमासाठी आलो. पण मला सांगण्यात आलं की साहेब (शरद पवार) आलेले आहेत, मग तेथूनच आपण एकत्र जाऊ. त्यामुळे मी शरद पवार यांच्या निवासस्थानी गेलेलो होतो, तेथून आम्ही एकत्र कृषी प्रदर्शनासाठी गेलो”, असं अजित पवार यांनी सांगितलं.राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी म्हटलं की जिल्हा परिषदेच्या निवडणुका दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढणार आहेत. त्यांच्या या वक्तव्याबाबत पत्रकारांनी अजित पवार यांना प्रश्न विचारला. यावर बोलताना अजित पवार म्हणाले की, “जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या बाबतीत शशिकांत शिंदे यांनी काय सांगितलं हे मी ऐकलं नाही. मी त्यासंदर्भातील माहिती घेऊन प्रतिक्रिया देईन. मात्र, एक आहे की आताच्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आम्ही स्थानिक पदाधिकाऱ्यांना युती आणि आघाडीसंदर्भातील अधिकार देत असतो. आता तरी आम्ही सगळे महायुतीत काम करत आहोत”, असं अजित पवार म्हणाले.गौतम अदानी बारामतीत येऊन गेले, आगामी काळात राज्यात आणि केंद्रात काही बदल दिसतील का? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता अजित पवार म्हणाले की, “गौतम अदानी हे बारामतीत एआयच्या इमारतीच्या उद्घाटनासाठी आले होते, ते उद्योगपती आहेत. मग उद्योगपतींचा आणि राजकारणात बदल होण्याचा काय संबंध?”दोन्ही पवार कुटुंब पुन्हा एकत्र येणार का? या प्रश्नावर बोलताना अजित पवार म्हणाले की, “तो आमचा अंतर्गत प्रश्न आहे. आम्ही परिवार म्हणून एकत्र आहोत. आम्ही सुख आणि दु:खात जात असतोच.”“जनतेचा कौल हा सर्वोच्च आहे आणि तो आम्ही पूर्ण आदरानं स्वीकारतो. विजयी झालेल्या सर्व उमेदवारांचं मी मनापासून अभिनंदन करतो, पुढील यशस्वी कार्यकाळासाठी शुभेच्छा देतो. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुकीत जिथं अपेक्षित यश मिळालं नाही, तिथं जनतेचा विश्वास पुन्हा प्रामाणिकपणे आणि दुप्पट जोमानं काम करत राहू, असं खात्रीनं स्पष्ट करतो.

### शरद पवारांची घेतली भेट

अजित पवार यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.“यश मिळवलेल्या सर्व उमेदवारांनी आपापल्या महानगरपालिकांमध्ये जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देत, विकास आणि लोककल्याणाच्या कामांना गती द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करतो. त्याचबरोबर जे विजयी होऊ शकले नाहीत, त्यांनीही निराश न होता जनतेसाठी कार्यतत्पर रहावं, केंद्रस्थानी नेहमी जनतेचं भलं आणि जनतेसाठी अखंड कार्यरत राहणं हेच ध्येय ठेवावं.

## माझ्या पराभवासाठी दोन मंत्र्यांनी ताकद लावली

# हा विजय माझा नसून प्रभागातील जनतेचा आहे : अमोल बालवडकर



।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे महापालिका निवडणुकीचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला आहे. पुण्यातील प्रभाग क्रमांक ९ चर्चेत होता. प्रभाग क्रमांक ९ मध्ये अमोल बालवडकर विरुद्ध लहू बालवडकर यांच्यामध्ये लढत होती. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उमेदवार अमोल बालवडकर यांनी निवडणुकीत दणदणीत विजय मिळवला.**

“हा विजय माझा नसून प्रभागातील जनतेचा आहे. हा विजय मी संपूर्ण जनतेला समर्पित करतो,” अशी प्रतिक्रिया अमोल बालवडकर यांनी विजयानंतर व्यक्त केली.अमोल बालवडकर म्हणाले की, “गेल्या अनेक वर्षांत प्रभागातील नागरिकांच्या प्रश्नांवर सातत्याने काम केले. रस्ते, पाणीपुरवठा, वाहतूक व्यवस्थापन, स्वच्छता आणि नागरिकांच्या दैनंदिन अडचणी सोडवण्यासाठी मी आणि माझी टीम रस्त्यावर उतरून काम केले. काम केल्यामुळेच लोकांनी माझ्यावर विश्वास ठेवला आणि निवडणुकीत ठाम साथ दिली.”ते पुढे म्हणाले, “या निवडणुकीत पुण्यातील दोन मंत्र्यांनी सर्व ताकद लावूनही जनतेने कामाला मत दिले आणि आपलाच विजय निश्चित केला. काही नेत्यांनी माझा पराभव करण्यासाठी सर्वस्व पणाला लावून प्रयत्न केले, पण शेवटी विजय सत्याचाच होतो. जनतेचा विश्वास आणि सत्याची बाजू मजबूत असेल तर कोणतीही ताकद तो विजय रोखू शकत नाही.”

“हा विजय ही केवळ निवडणुकीतील यशाची घोषणा नाही, तर जनतेच्या अपेक्षांना न्याय देण्याची जबाबदारी आहे. पुढच्या काळात अधिक गतीने विकासकामे पूर्ण करून प्रभाग ९ ला ‘मॉडेल प्रभाग’ बनवण्याचा माझा निर्धार आहे,” असेही अमोल बालवडकर यांनी सांगितले.

### सर्वाधिक मतांनी विजयी

या विजयानंतर प्रभागातील नागरिक, कार्यकर्ते आणि समर्थकांनी उत्स्फूर्तपणे आनंद व्यक्त केला.मंत्री चंद्रकांत पाटील यांनी लहू बालवडकर यांच्या प्रचारात उतरून मोठी भविष्यवाणी केली होता. पाटील म्हणाले होते, “प्रभाग 9 मधून भाजपचे लहू बालवडकर हे महाराष्ट्रातील सर्वाधिक मतांनी नगरसेवक म्हणून विजयी होतील. डायरीत लिहून ठेवा, ही भविष्यवाणी खरी ठरेल.” त्यावर अमोल बालवडकर यांनी पाटील यांची कोणतीही भविष्यवाणी खरी ठरत नसल्याचे सांगितले होते, त्यामुळे या प्रभागाकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं.

महापालिका निवडणूक : सायन्स पार्कमध्ये रोबोटिक्स एक्सलन्स सेंटर

# अजित पवारांच्या आरोपांना नागरिकांनी नाकारले

## निवडणूक निकालाद्वारे महापालिकेत आमदार लांडगे यांचे नेतृत्त्व सिद्ध

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीत प्रचारादरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार आणि भोसरीचे आमदार महेश लांडगे यांच्यात 'अरे तुरे'पर्यंत मजल पोहोचली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर आमदार लांडगे यांनी प्रचाराच्या काळात नमते घेतले. मात्र, निवडणूक निकालाद्वारे महापालिकेत आमदार लांडगे यांचे नेतृत्त्व सिद्ध झाले आहे.**



निवडणूक प्रचाराच्या काळात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आमदार महेश लांडगे यांच्यावर अत्यंत आक्रमक आणि वैयक्तिक स्वरूपाचे आरोप केले. गल्लीतील दादा, नासका आंबा, भंगार चोर, जमीन खरेदी, संपत्तीत वाढ, भ्रष्टाचाराचा राक्षस, फेकून देईन अशा शब्दांचा वापर करत पवार यांनी भाषेची मर्यादा ओलांडल्याची टीका झाली. महापालिकेच्या ठेवी मोडून शहर कर्जबाजारी केल्याचे, तसेच विकासकामांत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे आरोपही त्यांनी प्रचारसभांमध्ये लावले. या पार्श्वभूमीवर भाजपकडून आमदार महेश लांडगे यांनी अजित पवारांना थेट आणि सडेतोड उत्तर देत आव्हान स्वीकारले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर प्रचाराच्या एका टप्प्यावर त्यांनी भाष्य कमी केले असले, तरी प्रचाराची रणनीती मात्र त्यांनी पूर्णतः आपल्या हातात ठेवली. सूक्ष्म नियोजन, प्रभागनिहाय आढावा आणि स्थानिक मुद्द्यांवर आधारित प्रचार ही आमदार लांडगे यांची प्रमुख ताकद ठरली.

विशेष म्हणजे, भाजपच्या इतर तीन आमदारांनी अजित पवारांच्या टीकेला थेट प्रत्युत्तर दिले नाही. त्या तुलनेत आमदार लांडगे यांनी एकहाती खिंड लढवत 'स्थानिक विरुद्ध बारामतीचा कारभारी' हा मुद्दा प्रभावीपणे पुढे आणला. 'नको बारामती, नको भानामती', 'शहराचा कारभारी शहरातीलच' अशा फलकांद्वारे त्यांनी शहरातील मतदारांच्या मनातील स्थानिक नेतृत्वाची भावना अचूक हेरली. या प्रचाराने शहरातील नागरिकांमध्ये व्यापक चर्चा निर्माण केली आणि निवडणुकीचा रोखच बदलला.

**सलग दुसऱ्यांदा भाजपची एकहाती सत्ता**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रचारादरम्यान पिंपरी-चिंचवडमध्ये एक सभा आणि प्रचारफेरी काढली. त्यांनी अजित पवार यांच्यावर थेट टीका करण्याऐवजी शहरातील विकासकामे, पायाभूत सुविधा, औद्योगिक वाढ आणि नागरी सुविधांवर भर दिला. या सकारात्मक प्रचाराचा परिणाम थेट मतांमध्ये दिसून आला. मागील महापालिका निवडणुकीत भाजपला ७७ जागा मिळाल्या होत्या. यंदा त्यात सात जागांची वाढ होत भाजप ८५ जागांवर विजयी झाला. निर्विवाद बहुमत मिळवत भाजपने महापालिकेवर सलग दुसऱ्यांदा एकहाती सत्ता प्रस्थापित केली. या विजयामागे आमदार महेश लांडगे यांचे नेतृत्व, नियोजन आणि संघटनकौशल्य निर्णायक ठरल्याचे स्पष्ट झाले आहे.

### राष्ट्रवादीला रोखले!; शिवसेना मर्यादित

या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला मागील वेळीच्या तुलनेत एक जागा जास्त मिळून एकूण ३७ जागांवर समाधान मानावे लागले. मात्र, पक्षाचे अनेक मातब्बर उमेदवार पराभूत झाले. सलग दुसऱ्यांदा राष्ट्रवादी काँग्रेसला पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत अपेक्षित यश मिळवता आले नाही, हे या निकालातून स्पष्ट झाले.

शिवसेना (शिंदे गट) सहा जागांवर विजयी झाली, तर एका अपक्ष उमेदवाराने बाजी मारली. मात्र एकूण चित्र पाहता, भाजपच्या वर्चस्वासमोर विरोधक प्रभावी ठरू शकले नाहीत.

एकंदरीत, अजित पवारांच्या आक्रमक प्रचाराला मतदारांनी नाकारत विकास, स्थानिक नेतृत्व आणि संघटनशक्तीला प्राधान्य दिले. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निकालातून आमदार महेश लांडगे यांचे नेतृत्व केवळ सिद्ध झाले नाही, तर भविष्यातील शहरराजकारणाची दिशाही ठळकपणे स्पष्ट झाली आहे.

# नागरिकांचा विश्वास सार्थ ठरविणार - आ. शंकर जगताप

## पिंपरी-चिंचवड महापालिकेत भाजपचा ऐतिहासिक विजय; पक्ष कार्यालयात जल्लोषाचा उत्साह

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**'पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीमध्ये शहरातील नागरिकांनी भाजपाला एक हाती कौल दिला. शहरातील नागरिकांना विकासाचे व्हिजन मान्य आहे. आगामी काळात नागरिकांचा हा विश्वास सार्थ ठरवणार असल्याचे निवडणूक प्रचार प्रमुख तथा आमदार शंकर जगताप यांनी सांगितले.**



पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने १२८ जागांपैकी ८५ जागांवर निर्विवाद बहुमत मिळवत दणदणीत विजय संपादन केला आहे. या विजयामुळे शहराच्या राजकीय इतिहासात भाजपने आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले असून, पक्ष कार्यकर्ते व समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. या विजयाचा जल्लोष पिंपरीतील मोरवाडी येथील भाजप कार्यालयासमोर कार्यकर्त्यांनी साजरा केला. एकमेकांना पेढे भरवत या उत्साहात कार्यकर्ते सहभागी झाले.

यावेळी शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे, माजी प्राधिकरण अध्यक्ष सदाशिव खाडे, सरचिटणीस मधुकर बच्चे, विजय फुगे आदि उपस्थित होते. यावेळी आमदार शंकर जगताप म्हणाले, या निवडणुकीत भाजपने मांडलेले विकासाचे स्पष्ट व्हिजन, पायाभूत सुविधांचा विस्तार, सक्षम नागरी सुविधा, स्वच्छता, वाहतूक व्यवस्था आणि पारदर्शक प्रशासन यांना नागरिकांनी मोठ्या प्रमाणात पसंती दिल्याचे निकालातून स्पष्ट झाले आहे. मतदारांनी विकासाला प्राधान्य देत भाजपच्या कामगिरीवर शिक्कामोर्तब केले आहे. हा विजय म्हणजे नागरिकांचा विश्वास असून, तो सार्थ ठरवण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही आमदार जगताप स्पष्ट केले.

यावेळी सर्वांनी शहरवासीयांचे आभार मानत, आगामी काळात पिंपरी-चिंचवडच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी अधिक वेगाने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# शिक्षणाची नवी दिशा



## भूमिका

**कौशल्य विद्यापीठांची संकल्पना अलीकडच्या काळातली आहे. नुकतेच काही राज्यांनी यांची स्थापना केली आहे. आजघडीला महाराष्ट्रात तसेच हरियाणा, दिल्ली, गुजरात, राजस्थान, आसाम सारख्या राज्यात ही विद्यापीठे आहेत.**

'कौशल्य प्रशिक्षणा'तील सुसूत्रतेसाठी यापूर्वी २००८ ला स्थापन झालेल्या राष्ट्रीय कौशल विकास महामंडळाच्या (नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन – एनएसडीसी) प्रमाणपत्र व अनेक योजनांद्वारे मनुष्यबळ विकसित केले जात होते; त्यासाठी सेक्टर स्किल कौन्सिल्सचीही स्थापना करण्यात आली, त्यात विविध प्रकारच्या उद्योग क्षेत्रांतील मान्यवरांचा समावेश होता; परंतु प्रमाणपत्र-अभ्यासक्रमच सुरू होते आणि त्यातील काही दूरशिक्षणाद्वारे सुरू होते. याच्या पुढले पाऊल म्हणजे, कौशल्यावर आधारित पदवी व पदव्युत्तर पदवीची संकल्पना! ही संकल्पना 'कौशल्य विद्यापीठा'द्वारे राबवण्याचा उत्तम प्रयत्न केंद्र शासनाने केला आहे. अशा प्रकारच्या सर्व विद्यापीठांसाठी देशव्यापी एकरूप असा अभ्यासक्रम आराखडा (नॅशनल करिक्युलम फ्रेमवर्क) बनवला गेला असून कौशल्यावर आधारित व पारंपरिक विद्यापीठांद्वारे चालविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमांचे 'क्रेडिट फ्रेमवर्क' दिलेले आहे. 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'मध्येही कौशल्य विकासावर भर देण्यात आलेला आहेच.'कौशल्य विद्यापीठां'तून दिल्या जाणाऱ्या शिक्षणापैकी ४० टक्केच वर्गखोल्यांतले शिक्षण असावे आणि उर्वरित ६० टक्के वाटा हा प्रत्यक्ष कौशल्य-शिक्षणावरच आधारित असावा, अशी संकल्पना आहे. महाराष्ट्र शासनाने स्थापित केलेले कौशल्य विद्यापीठ हे राज्यव्यापी विद्यापीठ असणे अपेक्षित आहे. अन्य राज्यांतही राज्य विधेयकांतून या विद्यापीठांची स्थापना झालेली आहे. यापैकी पहिल्या- हरियाणातील 'विश्वकर्मा कौशल्य विश्वविद्यालया'ची स्थापना सन २०१६ मध्ये झाली. त्यानंतर जवळपास सहा वर्षांनी (मागच्या वर्षी) इमारतीचे बांधकाम दुधोला पलवल येथे झाले. दि राजस्थान आयएलडी युनिव्हर्सिटी -२०१७ (दौलतपूर), मग २०२० मध्ये आसाम स्किल युनिव्हर्सिटी (प्रस्तावित आवार : मंगल्दाई, जिल्हा दारंग ) आणि दिल्ली स्किल्स युनिव्हर्सिटी, तर गुजरात स्किल युनिव्हर्सिटी (शिलाज, अहमदाबाद)ची स्थापना २०२१ मध्ये झाली आहे. 'महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठा'ची स्थापना २०२२ ची आहे (विधेयक २०२१ मधले, प्रस्तावित ठिकाण : पनवेल-नवी मुंबई). अनेक इतर राज्यांनी कौशल्य विद्यापीठांची घोषणा केलेली आहे.दिल्ली स्किल्स युनिव्हसिटी'ने ब्राउन फील्ड पद्धतीने, दिल्लीत असलेल्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांतील डिप्लोमांचा समावेश विद्यापीठात करून घेतला. इथे तांत्रिक शिक्षणा बरोबरच इतर कौशल्यांवर आधारित अभ्यासक्रम देण्यात येत आहेत. असलेल्या मूलभूत सुविधांचा उपयोग करून या विद्यापीठांनी कार्याचा आरंभ केला आहे. राजस्थानच्या कौशल्य विद्यापीठाने महाविद्यालयांना संलग्नता दिली आहे. महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाने नवी मुंबई, पुणे व नागपूर येथे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम चालू केले आहेत. अभ्यासक्रम तयार करणे, प्रयोगशाळा, वर्ग खोल्या, प्राध्यापक नियुक्त्या, भौतिक सोयीसुविधा, परीक्षा विभाग, परीक्षा मंडळ, फी समिती, परिनियम, अभ्यास मंडळाची तसेच विद्यापरिषदेची स्थापना यांखेरीज कौशल्य विद्यापीठाला लागणारे उद्योग जगाशी निगडित 'ऑन द जॉब ट्रेनिंग' सुविहीतपणे होत राहील याची व्यवस्था व त्यासाठी नियामक मंडळाची स्थापना करणे हेही आवश्यक असते. अशा अनेक बाजू विठ्यापीठाच्या स्थापने पासून करणे आवश्यक होते. 'ग्रीनफिल्ड प्रोजेक्ट' असलेल्या महाराष्ट्र, आसाम, हरियाणा, गुजरात इथल्या कौशल्य विद्यापीठांचा प्रभाव किमान पाच वर्षांत -म्हणजे एक चार वर्षाची बॅच बाहेर पडल्यावर- सगळ्या पर्यंत पोहोचेल.महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठात २१अभ्यासक्रमांची निर्मिती करण्यात आली आहे. उद्योग समूहांशी ५५ करार केले असून सर्व अभ्यासक्रमांत हे उद्योग समूह विद्यार्थ्यांना 'ऑन द जॉब ट्रेनिंग' देणार आहेत. टाटा ट्रेंट, मॅकडोनाल्ड, मेट्रोपोलिस, केपीएमजी, पर्सिस्टन्ट सिस्टिम्स, वर्ल्ड ट्रेड सेन्टर यांसारख्या कंपन्यांचा /संस्थांचा समावेश आहे. कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमात 'डिझाइन थिंकिंग'वर भर देण्यात आला आहे.



## प्रासंगिक »

### शत्रू शरण

***एखाद्या तरुण-तरुणी जोडीने 'आमचे ठरले' असे म्हणत वर्षानुवर्षे हातात हात घालून हिंडावे पण प्रत्यक्षात अक्षता पडण्याची वेळ चाळिशीत यावी तसे या पक्षांचे झाले.***

राज आणि उद्धव यांनी एकत्र येण्याच्या जाहीर आणाभाका घेतल्या सप्टेंबरात. मोठ्या हौसेने त्यांचा 'दाखवण्याचा' समारंभही झाला. कांदेपोहे झाले. पण ते प्रत्यक्ष एकत्र आले निवडणुकीआधी दोन आठवडे. त्या एकत्र येण्यावर विश्वास ठेवणार कोण? आणि त्यांच्या एकमेव संयुक्त सभेत राज ठाकरे यांनी मुद्दा मांडून मांडला कोणता? तर अदानी समूहाच्या विस्ताराचा. वास्तविक या मुद्द्यावर राहुल गांधी आणि नंतर विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांनी हात पोळून घेतलेले आहेत. तरीही राज ठाकरे यांनी तो जणू सामान्यांच्या जीवनमरणाचा प्रश्न असल्यासारखे त्याचे सादरीकरण केले. ते झाले छान. पण लोकांच्या आयुष्याशी त्याचे काय देणे-घेणे? आपला राजकीय इतिहास असे सांगतो की भ्रष्टाचाराचा मुद्दा हा जोपर्यंत सामान्यांच्या जगण्याशी जोडला जात नाही.

'शेतकऱ्यांना सक्षम करायचे आहे की कमकुवत?' हा रमेश पाध्ये यांचा लेख (लोकसत्ता विचारमंच- १२ जुलै) वाचला. हा लेख पटण्याजोगा नाही कारण त्यातील मांडणी वाचकांची दिशाभूल करणारी आहे. हा लेख प्रामुख्याने किमान आधारभूत किमती व त्यात झालेल्या 'अवास्तव' वाढीवर बेतलेला आहे.

# शेतकऱ्यांना कुबड्या नको, स्वातंत्र्य द्या!

आधारभूत किमतीच्या कुबड्या काढल्या तर शेतकरी सक्षम कसा होईल या बाबतीत मात्र ते काही बोलत नाहीत.मी शेतकरी संघटनेचा अध्यक्ष होतो, तसेच मोदी सरकारने २०२० साली पारित केलेल्या तीन कृषी कायद्यांना स्थगिती दिल्यानंतर, कायद्यामध्ये दुरुस्त्या करून शिफारशी करण्यासाठी, सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या तीन सदस्यांच्या समितीत मी एक सदस्य होतो. शेतकरी संघटनेने किमान आधारभूत किमतीचे (एमएसपी) समर्थन कधीचे केलेले नाही तसेच एमएसपीचा कायदा व्हावा या मागणीला कडाडून विरोध केला आहे. इतकेच काय, शरद जोशींनी कृषी मूल्य आयोग बरखास्त करा अशी मागणी केलेली आहे.हरीतक्रांतीनंतर कृषीमूल्य आयोगाची स्थापन करण्यात आली मात्र किमान आधारभूत किंमत ठरवताना ती शेतीमालाच्या उत्पादन खर्चावर न ठरवता जागतिक बाजार, मागणी- पुरवठा स्थिती, राजकीय परिस्थिती, निवडणुका वगैरे लक्षात



घेऊन ठरवली जाते असे, असे ते म्हणतात व ते खरे आहे. याचा अर्थ ती उत्पादन खर्चावर आधारित नसे. पाध्ये यांच्या म्हणण्यानुसार १९८० मध्ये शरद जोशींनी सरकारवर दबाव टाकून आधारभूत किमती वाढवण्यास सुरुवात केली. शरद जोशींनी 'उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव' मागितला यात काय चूक झाली? त्याकाळी शेतकऱ्यांना येणारे अनेक खर्च हिशोबत धरले जात नसत किंवा अगदीच कमी धरले जात. शेणखताची बैलगाडी खर्चात धरताना ३/- रुपये प्रती गाडी व दूध उत्पादकांच्या उत्पन्नाच्या हिशोबत शेणखताची बैलगाडी ३०/- रुपयाला धरली जात असे. शेतकऱ्याला खते घेण्यासाठी प्रवास खर्च लागत नाही माल बाजारात न्यायला खर्च येत नाही हे कसे? त्या काळी तर फक्त तालुक्याच्या गावालाच खताची दुकाने असत व बाजार समित्या आज ही तालुक्याच्या गावीच आहेत. शेतकऱ्याच्या कुटुंबातील व्यक्ती शेतात कष्ट करतात त्याची मजुरी धरली जात नसे. वीजबिल तर आज ही धरले जात नाही हे हिशेबत धरायला नको? औद्योगिक वस्तूंची किंमत ठरवताना कारखानदार हे सगळे खर्च हिशोबात धरतोच ना? सीमांत शेतकऱ्याच्या शिवारात त्याच्या कुटुंबाला पुरेसे धान्य पिकत नाही, असे म्हटले आहे. सीमांत शेतकऱ्यांची व्याख्या म्हणजे पाच एकर ते अडीच एकर शेत जमिनीचा मालक अशी आहे. एखाद्या सीमांत शेतकऱ्याने पाच एकर गहू केला तर महाराष्ट्रात त्याला सरासरी ८० ते १०० क्विंटल गहू होतो. (पंजाबमध्ये याच्या दुप्पट होतो.) हा सीमांत शेतकरी काय १०० क्विंटल गहू घरी खाणार आहे का? त्याने कापूस, सोयाबीन, तुर, हरभरा केला तर एकरी किमान १० क्विंटल उत्पादन येते. हे सर्व तो घरी खातो का?

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## निवडणूक आयोगाला लिहिले पत्र
## काँग्रेसने छेडला 'ईव्हीएम' घोटाळ्याचा मुद्दा

# जि.प. निवडणुका मतपत्रिकेवर घ्या!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**अनेक राज्यांनी जनतेचा विश्वास टिकवण्यासाठी तसेच वाद टाळण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ईव्हीएम (इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र) ऐवजी मतपत्रिकेवर घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याधर्तीवर महाराष्ट्रातील जाहीर झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका मतपत्रिकेवरच घ्याव्यात, अशी मागणी काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी केली आहे. पटोले यांनी त्यासंदर्भात राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शनिवारी पत्र पाठवले आहे.**

## मतदाराचा अधिकार हिरावला






राज्यात झालेल्या २९ महानगरपालिका निवडणुकीत व्हीव्हीपॅट (मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरिक्षण चिन्ह) प्रणालीचा वापर करण्यात आला नाही. मताची खात्री करण्याचा मतदाराचा अधिकार हिरावला गेला. त्यात भर म्हणजे मतदारांच्या बोटाला लावलेली शाई हात धुतल्यानंतर पुसली जात होती. या साऱ्या प्रकारामुळे निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, विश्वासार्हता आणि आयोगाची निष्पक्षता यावर गंभीर प्रश्न चिन्ह उभे राहिले आहेत. याचा आयोगाने गंभीरपणे विचार करणे गरजेचे आहे. आयोगाच्या चुकीच्या नियोजनामुळे यावेळी पालिका निवडणुकीत मतदान कमी टक्के झाल्याचा आरोप पटोले यांनी केला आहे. महानगरपालिका निवडणुकांनी निवडणूक व्यवस्थेचा बुरखा पुर्णतः फाडला आहे. शहरातील अत्यल्प मतदानाची टक्केवारी केवळ मतदार उदासिन नसून निवडणूक प्रक्रियेवरचा जनतेचा विश्वास कमी होत असल्याचे निर्देशक आहे. देशातील अनेक राज्यांनी जनतेचा विश्वास टिकवण्यासाठी तसेच वाद टाळण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ईव्हीएम ऐवजी मतपत्रिकेवर घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. मग, महाराष्ट्रातच ईव्हीएमचा हट्ट का? व कोणाच्या फायद्यासाठी? असे प्रश्न मतदार विचारात असल्याचे पटोले यांनी आपल्या पत्रामध्ये म्हटले आहे.मतदार यादीतील घोळ, मतदान केंद्र शोधण्यासाठी मतदारांना दोन-तीन तास करावी लागणारी वणवण, हजारो मतदारांना मतदान न करताच परत जाण्याची येणारी वेळ. या साऱ्या बाबी निवडणूक आयोगाच्या अकार्यक्षमतेचे गंभीर निदर्शक आहेत, ही परिस्थिती लोकशाहीसाठी घातक आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या लोकशाहीच्या कणा आहेत. जनभावनेचा विचार करून राज्यात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या निवडणुका ईव्हीएम ऐवजी मतपत्रिकेवर घ्यायला हरकत नाही. तसे झाल्यास लोकशाहीवरील मतदारांचा विश्वास वाढेल, अशी मागणी पटोले यांनी केली आहे.एकुण २९ महानगरपालिकांच्या निवडणूक निकालांनी ईव्हीएम बाबतचा अविश्वास आणखी वाढला आहे. त्यामुळे ईव्हीएमच्या ऐवजी मतपत्रिकांची मागणी होत आहे. डोंबिवली, छत्रपती संभाजी नगर येथे मतमोजणी करताना ईव्हीएम बंद पडल्याच्या आणि त्या बदली केल्याच्या तक्रारी विरोधी गटातील उमेदवारांनी केल्या आहेत.अनेक राज्यांनी जनतेचा विश्वास टिकवण्यासाठी तसेच वाद टाळण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ईव्हीएम (इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र) ऐवजी मतपत्रिकेवर घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याधर्तीवर महाराष्ट्रातील जाहीर झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका मतपत्रिकेवरच घ्याव्यात, अशी मागणी काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी केली आहे. राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शनिवारी पत्र पाठवले आहे.

## शाई हात धुतल्यानंतर पुसली

व्हीव्हीपॅट (मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरिक्षण चिन्ह) प्रणालीचा वापर करण्यात आला नाही. मताची खात्री करण्याचा मतदाराचा अधिकार हिरावला गेला. त्यात भर म्हणजे मतदारांच्या बोटाला लावलेली शाई हात धुतल्यानंतर पुसली जात होती. या साऱ्या प्रकारामुळे निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, विश्वासार्हता आणि आयोगाची निष्पक्षता यावर गंभीर प्रश्न चिन्ह उभे राहिले आहेत.

# नगरसेवक पंचतारांकित हॉटेलात

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे घेणार यशापयशाचा आढावा

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीत पक्षाला मिळालेल्या यशापयशाचा आढावा घेण्यासाठी तसेच मंत्री आणि आमदारांच्या कामगिरीचे मुल्यमापन करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची मुंबईत बैठक बोलाविली आहे.**

या बैठकीत १२ जिल्हा परिषदांच्या निवडणुका जिंकण्याबाबतही आखणी करण्यात येणार असल्याची माहिती पक्षातील सूत्रांनी दिली. निवडून आलेल्या मुंबईतील सर्व नगरसेवकांना तीन दिवस पंचतारांकित हॉटेलात ठेवण्यात आले आहे. राज्यातील महापालिका निवडणुकांमध्ये शिवसेनेचे ३९९ नगरसेवक निवडून आले आहेत. यात मुंबईत २९, ठाणे ७५, कल्याण डोंबिवली ५४, नवी मुंबईत ४२, उल्हासनगर ३६, नाशिक २६, जळगाव २२ जागा, कोल्हापूर १५, छत्रपती संभाजी नगर १३, जालना १२ नगरसेवक निवडून आले. मुंबईत पक्षाला मिळालेल्या माफक यशाने तसेच अन्य महापालिकांमध्ये मोठा फटका बसल्याने शिवसेनेच्या गोटात अस्वस्थता पसरली आहे. ठाण्यात



शिवसेनेने दणदणीत विजय मिळविला असला तरी मुंबईत पक्षाला मोठा फटका बसला आहे. पक्षाने निश्चित विजय मिळेल अशा गृहित धरलेल्या १२-१५ जागांवर अनपेक्षितपणे पराभव पत्करावा लागला. त्यातही मुंबईत पक्ष वाढविण्याची ज्यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे, अशा नेत्यांनाच आपल्या नातेवाईकांना निवडूण आणता आलेले नाही.

त्यामुळे मुंबईतील शिवसेनेच्या कामगिरीवर शिंदे नाराज असल्याचे सांगितले जात आहे. अशाचप्रकारे मिरा- भाईंदर, लातूर, परभणी सारख्या महापालिकांमध्ये पक्षाची उडालेली दाणादाण शिंदे यांच्या जिव्हारी लागली असून या निवडणुकीत स्थानिक नेत्यांनी अपेक्षित कामगिरी केली नसल्याचे पक्षात बोलले जात आहे. या पार्श्वभूमिवर शिंदे यांनी उद्या मुंबईतील आपल्या निवासस्थानी पक्षाच्या नेत्यांची बैठक बोलाविली आहे. या बैठकीस मंत्री,बोलाविण्यात आले आहे. बैठकीत शिंदे महापालिका निवडणुकीतील मंत्री, आमदारांच्या कामगिरीची झाडाझडती घेणार आहेत. परिषदांच्या निवडणुकीला सामोरे जाताना पक्षाची निवडणूक रणनितीही ठरविली जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

## नवनिर्वाचित नगरसेवकांना मार्गदर्शन

आढावा घेऊन त्यांच्यावर जिल्हा परिषदेची जबाबदारी कशाप्रकारे सोपविण्यात येणार याचाही निर्णय बैठकीत होणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.मुंबई महापालिका निवडणुकीत विजयी झालेल्या २९ नगरसेवकांचे मार्गदर्शन शिबीर शिवसेनेने आयोजित केले आहे.

**ग्रीनलँडच्या देशांवर लादले टॅरिफ** १ फेब्रुवारी पासून या निर्णयाची अंमलबजावणी होणार

# ट्रम्प यांचा टॅरिफ बॉम्ब युरोपियन देशांवर

## ग्रीनलँडच्या देशांवर लादले टॅरिफ



।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**व्हेनेझुएलानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे ग्रीनलँडकडे वळले होते. हा भूभाग वेळ पडल्यास डेन्मार्ककडून हिसकावून घेऊ, अशी धमकी डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली होती. त्यांच्या या आक्रमक भूमिकेला युरोपातील काही देशांनी विरोध केला होता. या देशांवर टॅरिफ लादण्यास आपण मागेपुढे पाहणार नाही, असा इशारा ट्रम्प यांनी दिला होता. त्यानुसार आज त्यांनी ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, डेन्मार्कसह आठ युरोपीय देशांवर १० टक्के टॅरिफ (आयातशुल्क) लादण्याची घोषणा केली आहे. १ फेब्रुवारी पासून या निर्णयाची अंमलबजावणी होईल.**

ट्रुथ या सोशल मीडियावरील पोस्टमध्ये डोनाल्ड ट्रम्प म्हणाले, “डेन्मार्क, नॉर्वे, स्वीडन, फ्रान्स, जर्मनी, ब्रिटन, नेदरलँड्स आणि फिनलंड या देशांना टॅरिफचा सामना करावा लागेल. अमेरिकेचा ग्रीनलँडच्या खरेदीचा करार पुर्णत्वास गेला नाही तर १ जूनपासून टॅरिफ २५ टक्के केले जाईल.” ट्रम्प पुढे म्हणाले, हे देश अतिशय धोकादायक असा खेळ खेळत आहेत. त्यांनी गंभीर असा धोका पत्करला आहे. म्हणूनच, जागतिक शांतता आणि सुरक्षिततेचे रक्षण करण्यासाठी ही संभाव्य धोकादायक परिस्थिती लवकर संपवणे आवश्यक आहे. त्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची गरज आहे.अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मागच्या आठवड्यात ग्रीनलँड ताब्यात घेण्याचा मानस बोलून दाखवला होता. रशिया किंवा चीन हे देश या प्रदेशावर ताबा मिळवण्याची शक्यता असून ते रोखण्यासाठी हा भूभाग अमेरिकेच्या ताब्यात असणे आवश्यक असल्याचा इशारा त्यांनी दिला होता. व्हाईट हाऊसमध्ये तेल आणि वायू क्षेत्रातील कार्यकारी अधिकाऱ्यांच्या बैठकीत बोलताना ट्रम्प यांनी आपल्या विधानाचा पुनरुच्चार केला. त्यांनी स्पष्ट केले की, खनिजांनी समृद्ध असलेले हे बेट अमेरिकेच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी अत्यंत आवश्यक आहे. तसेच जर राजनैतिक मार्गाने ग्रीनलँड खरेदी करणे शक्य झाले नाही, तर अमेरिकेला ‘कठोर मार्गाचा’ अवलंब करावा लागू शकतो असेही त्यांनी यावेळी सूचित केले.

ग्रीनलँड हा कित्येक वर्षे डेन्मार्कचा अधिकृत भूभाग मानला जाई. १९५३ मध्ये ग्रीनलँडला डेन्मार्कचा भाग म्हणून अधिकृत मान्यता मिळाली. येथील ५६ हजार नागरिकांपैकी ८९ टक्के इन्युइट आहेत. १९७८ मध्ये डेन्मार्कने ग्रीनलँडच्या नागरिकांना मर्यादित स्वातंत्र्य (होम रूल) घेण्याविषयी सार्वमत घेण्याची संमती दिली. २००८ मध्ये अशा प्रकारे सार्वमत घेतले गेले, तेव्हा ७६ टक्के ग्रीनलँडवासियांनी होमरूलला पसंती दिली. याअंतर्गत ग्रीनलँडमध्ये स्वतंत्र पार्लमेंट उभारण्यात आली. परराष्ट्र धोरण, चलन आणि संरक्षण ही महत्त्वाची क्षेत्रे वगळता, इतर बहुतेक क्षेत्रांबाबत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य डेन्मार्कने ग्रीनलँडला बहाल केले आहे. त्यामुळे ग्रीनलँड हा स्वतंत्र देश नसला, तरी तो डेन्मार्कचा स्वायत्त प्रांत मानला जातो.ग्रीनलँड खरेदण्याची भाषा करणारे डोनाल्ड ट्रम्प हे पहिले अध्यक्ष नव्हेत. याआधी १८६७मध्ये अँड्रयू जॉन्सन यांनी प्रथम ही कल्पना मांडली. १९१० मध्ये तत्कालीन अध्यक्ष विल्यम टॅफ्ट यांनीही असा प्रस्ताव मांडला. हॅरी ट्रूमन यांच्या अध्यक्षपदाच्या कारकीर्दीत दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी ग्रीनलँडचा ताबा अमेरिकेने घेतला इतर कोणत्याही देशाला तेथे येण्यापासून काही काळ मज्जाव केला. त्यांनीही मग डेन्मार्ककडे ग्रीनलँडच्या खरेदीचा प्रस्ताव सादर केला, जो नामंजूर झाला. पण ट्रम्प यांनी त्यांच्या अध्यक्षपदाच्या पहिल्या कार्यकाळात ग्रीनलँडवर ताबा घेण्याच्या दृष्टीने सल्लामसलत सुरू केली होती. ग्रीनलँडचा ताबा मिळाल्यास आर्क्टिक जवळून अटलांटिक-पॅसिफिक सागरभ्रमण अतिशय सोयीचे ठरू शकते. यामुळे रशियावर वचक बसवण्यासाठी अमेरिकेला उपलब्ध तळांपेक्षा अधिक तळ उभारता येतील.

### आठ देशांवर १० टक्के टॅरिफ

ट्रुथ या सोशल मीडियावरील पोस्टमध्ये डोनाल्ड ट्रम्प म्हणाले, “डेन्मार्क, नॉर्वे, स्वीडन, फ्रान्स, जर्मनी, ब्रिटन, नेदरलँड्स आणि फिनलंड या देशांना टॅरिफचा सामना करावा लागेल. अमेरिकेचा ग्रीनलँडच्या खरेदीचा करार पुर्णत्वास गेला नाही तर १ जूनपासून टॅरिफ २५ टक्के केले जाईल.” ट्रम्प पुढे म्हणाले, हे देश अतिशय धोकादायक असा खेळ खेळत आहेत.

# इंडिगोला DGCA चा दणका!

## डिसेंबरमधील ढिसाळ कारभाराबद्दल ठोठावला 22 कोटींचा दंड




।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**डिसेंबर २०२५ मध्ये ३ ते ५ डिसेंबर दरम्यान इंडिगोच्या ढिसाळ नियोजनामुळे विमान सेवेचा बोजवारा उडाला होता. देशभरातील अनेक विमानतळावरील हजारो विमानांचे उड्डाण रद्द झाले होते. ज्यामुळे शेकडो प्रवासी विमानतळांवर खोळंबले होते. यानंतर आता महिन्याभराने नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (DGCA) इंडिगोला दणका देत २२.२० कोटी रुपयांचा आर्थिक दंड ठोठावला आहे.**

डिजीसीएने शनिवारी याबाबतचे निवेदन प्रसिद्ध केले. त्यात म्हटले की, डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात प्रवाशांना मोठ्या प्रमाणात गैरसोयीचा सामना करावा लागला. एअरलाइनच्या ऑपरेशनल त्रुटींचा आढावा घेतल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. ३ ते ५ डिसेंबर दरम्यान झालेल्या गोंधळाची चौकशी करण्यासाठी डीजीसीएने चार सदस्यांची समिती स्थापन केली होती. त्यानंतर महिन्याभराने ही कारवाई करण्यात आली आहे. या तीन दिवसांत इंडिगोची दोन हजारांहून अधिक उड्डाणे रद्द करण्यात आली होती. तर दीड हजारांहून अधिक विमानांना कमालीचा विलंब झाला होता. देशातील ६० टक्क्यांहून अधिक देशांतर्गत हवाई प्रवाशांची वाहतूक इंडिगो कंपनीच्या माध्यमातून होते. या गोंधळाला नवीन फ्लाइट ड्युटी टाइम लिमिटेशन (FDTL) नियम जबाबदार असल्याचे कंपनीच्या वतीने सांगण्यात आले होते. या नियमामुळे क्रूची टंचाई निर्माण झाली होती. डिजीसीएने आपल्या निवेदनात म्हटले की, ३ ते ५ डिसेंबर २०२५ दरम्यान मेसर्स इंडिगोच्या विमान वाहतुकीमध्ये व्यापक अडचणी आल्यानंतर २,५०७ उड्डाणे रद्द झाली तर १,८५२ उड्डाणांना विलंब झाला. विविध विमानतळांवर अडकून पडलेल्या तीन लाखांहून अधिक प्रवाशांची यामुळे गैरसोय झाली. डीजीसीएच्या दंडानंतर इंडिगोने म्हटले की, या निर्देशांची आम्ही दखल घेऊ आणि त्यानुसार योग्य ती पावले उचलू. तसेच डिसेंबरमध्ये आलेल्या व्यत्ययानंतर इंडिगोमधील अंतर्गत प्रक्रियेला सशक्त करणे आणि त्यात लवचिकता आणण्याबद्दल आढावा सुरू आहे. जेणेकरून आमच्या १९ वर्षांहून अधिकच्या कारकिर्दीतील अनुभवातून आम्ही चांगली सेवा देऊ.निवेदन प्रसिद्ध केले. त्यात म्हटले की, डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात प्रवाशांना मोठ्या प्रमाणात गैरसोयीचा सामना करावा लागला.

### दोन हजारांहून अधिक उड्डाणे रद्द

एअरलाइनच्या ऑपरेशनल त्रुटींचा आढावा घेतल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. ३ ते ५ डिसेंबर दरम्यान झालेल्या गोंधळाची चौकशी करण्यासाठी डीजीसीएने चार सदस्यांची समिती स्थापन केली होती. त्यानंतर महिन्याभराने ही कारवाई करण्यात आली आहे. या तीन दिवसांत इंडिगोची दोन हजारांहून अधिक उड्डाणे रद्द करण्यात आली होती.

# ‘लपंडाव’ मालिकेसाठी रुपाली भोसलेने घेतली ‘अशी’ मेहनत,

स्टार प्रवाहच्या ‘लपंडाव’ मालिकेत प्रेक्षकांना काही दिवसांपूर्वीच एक मोठा ट्विस्ट पाहायला मिळाला. सरकार आपल्या मुलीशी इतकं वाईट का वागते असा प्रश्न ही मालिका सुरू झाल्यापासून प्रत्येकाला पडला होता. मात्र, सरकार ही सखीची खरी आई नसल्याचं आता स्पष्ट झालेलं आहे. खऱ्या तेजस्विनीला सरकारने म्हणजेच मनस्विनीने आपल्या ताब्यात ठेवलेलं असतं. रुपाली भोसले सध्या मालिकेत तेजस्विनी ( सखीची खरी आई ) व मनस्विनी ( सरकार ) अशा दोन भूमिका साकारत आहे. सखीची खरी आई गेली कित्येक वर्षे मनस्विनीच्या ताब्यात असते. याचा उलगडा नुकताच मालिकेत करण्यात आला. ‘लपंडाव’ मालिकेचा हा विशेष भाग प्रत्येकाला आवडला. मात्र, ही दुहेरी भूमिका साकारण्यासाठी अभिनेत्री रुपाली भोसलेने प्रचंड मेहनत घेतली होती. विशेष म्हणजे तिला एकाच दिवशी तब्बल ५ वेगवेगळ्या लूक्समध्ये तयार होऊन शूट करायचं होतं.रुपालीचे ५ वेगवेगळे लूक्स कोणते होते आणि अभिनेत्रीने यासाठी कशी तयारी केली याबद्दल रुपाली भोसलेने पोस्ट शेअर करत माहिती दिली आहे.रुपाली भोसले लिहिते, “अशक्य ते शक्य! एकाच दिवशी पाच वेगवेगळे लूक्स शूट करणं म्हणजे खरंच एका



वेगळ्या प्रवासातून जाण्यासारखं होतं. एक कलाकार म्हणून अशा क्षणी जाणवतं की, मी हे काम इतकं का प्रेमाने करते? थकवा होतो? हो… पण हा थकवा मनाला पूर्णपणे समाधान देणारा असतो. प्रत्येक लूक, प्रत्येक फ्रेम, प्रत्येक भावना सगळ्यासाठी खूप मेहनत घेतली. प्रत्येक लूकसाठी नव्याने तयार करावी लागली आणि ही संधी मिळाल्याबद्दल मी मनापासून आभारी आहे. माझी संपूर्ण टीम… मेकअप आर्टिस्ट, हेअर डिपार्टमेंट, स्टायलिस्ट, ADS, लेखक, क्रिएटिव टीम, दिग्दर्शक, DOP, निर्माते, स्टार प्रवाहची संपूर्ण टीम आणि या सगळ्या पात्रांवर आणि कलाकार म्हणून माझ्यावर भरभरून प्रेम करणारे मायबाप प्रेक्षक! तुमच्या पाठिंब्याशिवाय हे शक्यच नव्हतं. माझ्यावर विश्वास ठेवून मला प्रत्येकवेळी माझं सर्वोत्तम देण्यासाठी प्रेरणा दिल्याबद्दल खूप प्रेम. आज सेटवर उभं राहून, एका पात्रातून दुसऱ्यात जाताना, मनात एकच भावना होती…. कृतज्ञता! या प्रवासासाठी, या संधींसाठी आणि यामागे उभ्या असलेल्या प्रत्येकाला सलाम! प्रत्येक व्यक्तीची मेहनत यामागे होती… शब्दांच्या पलीकडे कृतज्ञ. LOVE YOU ALL विठ्ठल सर, सोमनाथ, आशु, आकाश, डीओपी भरतजी आणि त्यांची टीम”दरम्यान, रुपालीने शेअर केलेल्या पोस्टवर नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. “खरंच तुम्हाला सॅल्युट आहे”, “मस्त व्हिडीओ बनवला मॅडम तुमची मेहनत फळाला आली”, “याला म्हणतात डेडीकेशन” अशा प्रतिक्रिया नेटकऱ्यांनी या व्हिडीओवर दिल्या आहेत.

## तो चांगला अभिनेता आहे पण

अभिनेता आर माधवन हा बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेता आहे. त्यांने त्याच्या सहज सुंदर अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. आर माधवनचा मोठा चाहतावर्ग आहे. नुकताच त्याचा ‘आप जैसा कोई’ हा चित्रपट नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाला आहे. आर माधवन चित्रपट तसेच इंडस्ट्रीतील कलाकारांबद्दल आपली मतं मांडत असतो. आता त्याने बॉलीवूड अभिनेता रणवीर सिंहबद्दल केलेलं वक्तव्य चर्चेत आहे. आर माधवन लवकरच ‘धुरंदर’ चित्रपटात झळकणार आहे. आदित्य धरने या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. यामध्ये अभिनेता रणवीर सिंह मुख्य भूमिकेतून झळकणार आहे. या सिनेमात आर माधवन व रणवीर सिंह पहिल्यांदाच एकत्र काम करत आहेत. आर माधवनने नुकतच रणवीर सिंहबद्दल वक्तव्य केलं आहे.‘इंडियन एक्स्प्रेस’च्या वृत्तानुसार आर माधवन रणवीर सिंहबद्दल म्हणाला, “मला वाटत नाही की, रणवीर सिंहला कधी नकार मिळाले असतील.

## माझ्याशी लग्न करशील?

सोशल मीडियाद्वारे अनेक चाहते आपल्या आवडत्या कलाकारांना लग्न करण्याची मागणी करताना दिसतात. चाहत्यांच्या या मागणीला कलाकार मंडळी अनेकदा मजेदार किंवा हलक्या-फुलक्या पद्धतीने उत्तर देतात. असंच काहीसं झालं आहे अभिनेत्री जिनिलीया देशमुख हिच्याबरोबर. साऊथ आणि बॉलीवूडसह मराठी इंडस्ट्रीत आपल्या अभिनयाने आणि मनमोहक सौंदऱ्यानं अनेकांची मनं जिंकणारी अभिनेत्री म्हणजे जिनिलीया देशमुख. आपल्या अभिनयाने चर्चेत राहणारी जिनिलीया सोशल मीडियावरही तितकीच सक्रीय असते. सोशल मीडियावर ती तिचे अनेक स्टायलिश फोटो शेअर करत असते. त्याचबरोबर ती रितेशबरोबरही काही मजेशीर व्हिडीओ शेअर करत असते. अशातच जिनिलीयाने सोशल मीडियाद्वारे चाहत्यांशी संवाद साधला.अभिनेत्रीने इन्स्टाग्रामवरील आस्क मी सेशनद्वारे चाहत्यांना प्रश्न विचारण्यास सांगितलं. अशातच एका चाहत्याने जिनिलीयाला चक्क लग्नाची मागणी घातली आहे. इन्स्टाग्राम स्टोरीवर चाहत्याने असं म्हटलं की, “माझं तुझ्यावर प्रेम आहे, लग्न करशील का?” चाहत्याच्या या प्रश्नाला उत्तर देत जिनिलीया असं म्हणाली, “मी विचार केला असता; पण माझं सर्वात सुंदर व्यक्तिबरोबर लग्न केलं आहे.”जिनीलियाने दिलेल्या या उत्तरातून त्याचं रितेशवरील प्रेम दिसून येतं. यानंतर तिला आणखी एका चाहत्याने नात्याबद्दल सल्ला विचारला. यावर जिनिलीयाने “कोणाचाही सल्ला ऐकू नका. तुम्ही स्वत: त्या नात्याचा अनुभव घ्या” असं म्हणाली. दरम्यान, रितेश-जिनिलीयाकडे एक आदर्श जोडी म्हणून पाहिलं जातं.



## कलाकारांना फक्त ऐकूनच घ्यावं लागतं

प्रसिद्ध राशीचक्रकार शरद उपाध्ये यांनी काही दिवसांपूर्वीच फेसबूक पोस्ट शेअर करत निलेश साबळेवर टीका केली होती. यानंतर निलेशने सविस्तर व्हिडीओ शेअर करत याप्रकरणी आपली बाजू स्पष्ट केली. कोणतीही पोस्ट लिहिताना नीट माहिती घेणं आवश्यक आहे. सरांचा मी फॅन होतो आणि कायम राहीन असंही अभिनेत्याने त्याच्या व्हिडीओमध्ये सांगितलं होतं. आता नुकत्याच ‘लोकशाही’ला दिलेल्या मुलाखतीत डॉ. निलेश साबळेने हा विषय माझ्यासाठी कायमचा संपला असून मी कायम शरद उपाध्ये सरांचा आयुष्यभर आदर करेन असं सांगत पुन्हा एकदा या प्रकरणावर भाष्य केलं आहे.शरद उपाध्ये प्रकरणाविषयी बोलताना निलेश साबळे म्हणाला, “मी तो विषय आता विसरून गेलोय, तुम्ही विचारलात म्हणून…कारण, एखादी गोष्ट तेव्हाच थांबते जेव्हा आपण त्याविषयीचं बोलणं थांबवतो. मी त्या व्हिडीओमध्ये नमूद केल्याप्रमाणे सन्माननीय शरद उपाध्ये सरांनी यापूर्वी सुद्धा दोन-तीनवेळा अशा पोस्ट केल्या होत्या. तेव्हा मी गोष्टी सोडून दिल्या होत्या. सहा वर्षांपूर्वी सुद्धा त्यांनी अशीच एक पोस्ट लिहिली होती… त्यातही त्यांनी बरंच काही म्हटलं होतं.”अभिनेता पुढे म्हणाला, “शेवटी सांगायचं काय तर कलाकारांना फक्त ऐकूनच घ्यावं लागतं. कलाकार व्यक्त झाले तरी समस्या निर्माण होते आणि एखादा कलाकार व्यक्त झाला नाही तरी समस्या निर्माण होतात. पूर्वी या गोष्टी व्हायच्या नाहीत. पण, आता काय झालंय… प्रत्येकाच्या हातात मोबाइल आहे. त्यामुळे मला अमिताभ बच्चन यांच्याबद्दल जरी लिहायचं असेल तरी मी पटकन लिहू शकतो. माझी पोस्ट जर त्यांच्यापर्यंत पोहोचली.

## राशाच्या जबरदस्त डान्सने वेधलं लक्ष

बॉलीवूडच्या कलाकारांची मुलं आता मोठ्या पडद्यावर पाहायला मिळत आहेत. २०२३मध्ये शाहरुख खानची मुलगी सुहाना खान, अमिताभ बच्चन यांचा नातू अगस्त्य नंदा, श्रीदेवींची मुलगी खुशी कपूर यांनी बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं. त्यानंतर गेल्या वर्षी आमिर खानचा मुलगा जुनैद खानने ‘महाराज’ चित्रपटाच्या माध्यमातून इंडस्ट्रीत पाऊल ठेवलं. आता रवीना टंडनची १९ वर्षांची मुलगी मोठ्या पडद्यावर झळकण्यासाठी सज्ज झाली आहे. तिच्या पहिल्या-वहिल्या चित्रपटातील गाणं प्रदर्शित झालं असून तिच्या जबरदस्त डान्सने सगळ्यांचं लक्ष वेधलं आहे. नेटकरी रवीना टंडनच्या मुलीची तुलना सुहाना खान, खुशी कपूरसह कतरिना कैफबरोबर करत आहेत. रवीना टंडनच्या १९ वर्षीय मुलीचं नाव राशा थडानी आहे. ती ‘आजाद’ या चित्रपटाच्या माध्यमातून बॉलीवूडमध्ये पदार्पण करण्यासाठी तयार झाली आहे. याच चित्रपटातील तिचं पहिलं गाणं ‘उई अम्मा’ प्रदर्शित झालं आहे. या गाण्यावर राशाचा डान्स पाहून नेटकरी भरभरून कौतुक करत आहेत. तिने आपल्या डान्ससह हावभावाने सगळ्यांची मनं जिंकली आहेत.राशा थडानीचं ‘उई अम्मा’ गाणं ४ जानेवारीला प्रदर्शित झालं. मधुबंती बागने हे गाणं गायलं असून अमित त्रिवेदीने संगीतबद्ध केलं आहे. तर अमिताभ भट्टाचार्य गीतकार आहेत. या गाण्यातील जबरदस्त डान्समुळे राशा चांगलीच भाव खाऊन गेली आहे. त्यामुळेच तिचं कौतुक होतं आहे.राशाचं ‘उई अम्मा’ गाणं पाहून एका नेटकऱ्याने लिहिलं की, हे खरं पदार्पण आहे. तिचे हावभाव जबरदस्त आहेत. तर दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं, “सुहाना खान आणि खुशी कपूरपेक्षा राशाने खूप छान परफॉर्मन्स केला आहे.



## १८ धावांनी दणदणीत विजय

## बांगलादेशला विजयासाठी १६५ धावांचं आव्हान

# बांगलादेशच्या जबड्यातून हिसकावला विजय

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय संघाने बांगलादेशवर थरारक विजय मिळवला. टीम इंडियाने अक्षरशः बांगलादेशच्या जबड्यातून विजय हिसकावून घेत १८ धावांनी दणदणीत विजयाची नोंद केली. आयुष म्हात्रेची चाल, विहान मल्होत्राची उत्कृष्ट गोलंदाजी अन् वैभव सूर्यवंशीचा सीमारेषेवर अफलातून झेल हे या विजयाचे हायलाईट्स ठरले. भारत आणि बांगलादेश यांच्यातील अंडर-१९ विश्वचषक सामन्यात ढगाळ वातावरण होतं आणि पावसामुळे दोन वेळा सामना थांबवण्यात आला. दुसऱ्यांदा सामना थांबवण्यात आला, तेव्हा २९ षटकांचा सामना करण्यात आला आणि बांगलादेशला विजयासाठी १६५ धावांचं आव्हान देण्यात आलं.**

## मल्होत्राची मॅचविनिंग गोलंदाजी



बांगलादेशचा संघ २ विकेट्स गमावत सहज धावा करत होता. पण तितक्यात आयुष म्हात्रेने मोठा डाव खेळला. कर्णधार आयुष म्हात्रेने २२ व्या षटकात उपकर्णधार विहान मल्होत्राला गोलंदाजी देण्याचा निर्णय घेतला. विहानने दुसऱ्याच चेंडूवर सिद्दीकीला झेलबाद केलं. यानंतर २४व्या षटकात शेख पवेजला झेलबाद केलं. २६व्या षटकातील दुसऱ्या चेंडूवर त्याने बसीर रतुलला झेलबाद केलं. या विकेटमध्ये वैभव सूर्यवंशीचं मोठं योगदान आहे, ज्याने उत्कृष्ट झेल टिपला. यानंतर २८व्या षटकातील त्याच्या पहिल्याच चेंडूवर अल फहाद धावबाद झाला आणि तिसऱ्या चेंडूवर त्याने चौकार लगावलेल्या रिझानल झेलबाद केलं. बांगलादेशला पहिल्याच षटकात विकेटचा धक्का बसला. यानंतर रिफत बेग व कर्णधार तमिमने संघाचा डाव सावरला. रिफत ३७ धावा करत बाद झाला. २ विकेट्सवर ९३ धावा अशी संघाची स्थिती असताना पावसाने हजेरी लावली. ब्रेकनंतर संघाला ७५ चेंडूत ७० धावा करायच्या होत्या. पण भारताच्या खेळाडूंनी मात्र धावा करू दिल्या नाहीत. विहान मल्होत्राने सिद्दीकीला बाद केलं आणि बांगलादेशने विकेट गमावण्याचा सिलसिला सुरू झाला. १०६ वर ३ विकेट्सपासून १४६ धावांवर संपूर्ण बांगलादेश संघ सर्वबाद झाला.भारताकडून उपकर्णधार विहान मल्होत्रा जो पार्ट टाईम गोलंदाज आहे, त्याने ४ षटकांत १४ धावा देत ४ विकेट्स घेतल्या. तर खिलान पटेलने २ विकेट्स तर दिपेश देवेंद्रन, हेनिल पटेल व कनिष्क चौहान यांनी प्रत्येकी १-१ विकेट्स घेतल्या.बांगलादेशने नाणेफेक जिंकत भारताला फलंदाजीसाठी पाचारण केलं. भारताकडून आयुष म्हात्रे लवकर बाद झाला आणि त्याच्यानंतर झटपट २ विकेट्स गमावले. यानंतर वैभव सूर्यवंशी व अभिज्ञान कुंडू यांनी संघाच्या डावाची जबाबदारी घेतली. यासह दोघांनी ९९ चेंडूत ६२ धावांची भागीदारी रचली. वैभव सूर्यवंशीने ६७ चेंडूत ६ चौकार व ३ षटकारांच्या मदतीने ७२ धावांची खेळी केली. तर अभिज्ञान कुंडूने ११२ चेंडूत ४ चौकार व ३ षटकारांच्या मदतीने ८० धावा केल्या. तर कनिष्क चौहानने २८ धावांचं महत्त्वपूर्ण योगदान दिलं. तर दीपेश देवेंद्रन ११ धावा केल्या. भारतीय संघाने बांगलादेशवर थरारक विजय मिळवला. टीम इंडियाने अक्षरशः बांगलादेशच्या जबड्यातून विजय हिसकावून घेत १८ धावांनी दणदणीत विजयाची नोंद केली. आयुष म्हात्रेची चाल, विहान मल्होत्राची उत्कृष्ट गोलंदाजी अन् वैभव सूर्यवंशीचा सीमारेषेवर अफलातून झेल हे या विजयाचे हायलाईट्स ठरले. भारत आणि बांगलादेश यांच्यातील अंडर-१९ विश्वचषक सामन्यात ढगाळ वातावरण होतं आणि पावसामुळे दोन वेळा सामना थांबवण्यात आला. दुसऱ्यांदा सामना थांबवण्यात आला, तेव्हा २९ षटकांचा सामना करण्यात आला आणि बांगलादेशला विजयासाठी १६५ धावांचं आव्हान देण्यात आलं. बांगलादेशचा संघ २ विकेट्स गमावत सहज धावा करत होता. पण तितक्यात आयुष म्हात्रेने मोठा डाव खेळला. कर्णधार आयुष म्हात्रेने २२ व्या षटकात उपकर्णधार विहान मल्होत्राला गोलंदाजी देण्याचा निर्णय घेतला. विहानने दुसऱ्याच चेंडूवर सिद्दीकीला झेलबाद केलं. यानंतर २४व्या षटकात शेख पवेजला झेलबाद केलं. २६व्या षटकातील दुसऱ्या चेंडूवर त्याने बसीर रतुलला झेलबाद केलं. या विकेटमध्ये वैभव सूर्यवंशीचं मोठं योगदान आहे, ज्याने उत्कृष्ट झेल टिपला. यानंतर २८व्या षटकातील त्याच्या पहिल्याच चेंडूवर अल फहाद धावबाद झाला.

## सूर्यवंशीची कॅच टर्निंग पॉईंट

आणि तिसऱ्या चेंडूवर त्याने चौकार लगावलेल्या रिझानल झेलबाद केलं. बांगलादेशला पहिल्याच षटकात विकेटचा धक्का बसला. यानंतर रिफत बेग व कर्णधार तमिमने संघाचा डाव सावरला. रिफत ३७ धावा करत बाद झाला. २ विकेट्सवर ९३ धावा अशी संघाची स्थिती असताना पावसाने हजेरी लावली. ब्रेकनंतर संघाला ७५ चेंडूत ७० धावा करायच्या होत्या. पण भारताच्या खेळाडूंनी मात्र धावा करू दिल्या नाहीत. विहान मल्होत्राने सिद्दीकीला बाद केलं आणि बांगलादेशने विकेट गमावण्याचा सिलसिला सुरू झाला.

# वैभव सूर्यवंशीचा वर्ल्ड रेकॉर्ड!

## U-19 इतिहासात अशी कामगिरी करणारा जगातील पहिला खेळाडू

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयसीसी अंडर-१९ विश्वचषक २०२६ स्पर्धा खेळवली जात आहेत. या स्पर्धेत भारताने विजयाने सुरूवात केली आहे. अंडर-१९ विश्वचषकात भारताच्या संघात सर्वाधिक लक्ष १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीच्या फटकेबाजीवर असणार आहे. पहिल्याच सामन्यात २ धावांवर बाद झाल्यानंतर वैभव सूर्यवंशीने बांगलादेशविरूद्ध दुसऱ्या सामन्यात ७२ धावांची खेळी करत वर्ल्ड रेकॉर्ड केला आहे.**




बांगलादेशविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात १४ वर्षीय धडाकेबाज फलंदाज वैभव सूर्यवंशीने आणखी एक ऐतिहासिक कामगिरी केली. बुलावायो येथे खेळल्या जात असलेल्या बांगलादेशविरूद्ध सामन्यात वैभवने फक्त ६७ चेंडूत ६ चौकार व ३ षटकारांच्या मदतीने ७२ धावांची शानदार खेळी केली आणि या खेळीदरम्यान त्याने विश्वविक्रमाला गवसणी घातली. आक्रमक फलंदाजीसाठी ओळखल्या जाणाऱ्या वैभव सूर्यवंशीने या सामन्यात उत्कृष्ट फलंदाजी करत संघासाठी महत्त्वपूर्ण धावा केल्या. आक्रम फलंदाजी करणाऱ्या वैभवने फलंदाजीसाठी अवघड असलेल्या खेळपट्टीवर त्याने सावध फलंदाजी करत संधी मिळताच आक्रमक फलंदाजी केली. वैभवने फक्त ३० चेंडूत त्याचं अर्धशतक पूर्ण केलं. यासह वैभव सूर्यवंशीने पुरुषांच्या १९ वर्षांखालील विश्वचषकाच्या इतिहासात सर्वात कमी वयात अर्धशतक झळकावण्याचा नवा विश्वविक्रम रचला. त्याने १४ वर्षे आणि २९६ दिवस वय असताना ही कामगिरी केली.कमालच्या नावावर होता, ज्याने २०१४ मध्ये १५ वर्षे १९ दिवस वय असताना वेस्ट इंडिजविरुद्ध अर्धशतक झळकावलं होतं.

## बाबर आझम तिसऱ्या स्थानावर

वैभवच्या या कामगिरीमुळे पाकिस्तानचा स्टार फलंदाज बाबर आझम आता या यादीत तिसऱ्या स्थानावर घसरला आहे. त्याने २०१० मध्ये १५ वर्षे आणि ९२ दिवस वय असताना वेस्ट इंडिजविरुद्ध हा पराक्रम केला होता.वैभवने अर्धशतक पूर्ण केलं, तेव्हा संघाची धावसंख्या फक्त ६८ होती. त्यापैकी ५० धावा वैभवने एकट्याने केल्या.

महाईन्यूज ™
स्मार्ट PCMC SMART CITY
ePaper
epaper.mahaenews.com
। रविवार ।
दि. 18 जानेवारी 2026
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## पिंपरी चिंचवड :काही प्रभागांमध्ये अत्यंत अनपेक्षित निकाल

# डॉ. सुहास कांबळे, तरस, जगताप, प्रियंका कुदळे 'जायंट किलर'

### नवख्या चेहऱ्यांनी बाजी मारली; यंदाच्या महापालिकेच्या सभागृहात 64 नवे चेहरे प्रवेश करणार

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड :काही प्रभागांमध्ये अत्यंत अनपेक्षित निकाल लागल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. प्रस्थापित व वजनदार उमेदवारांचा पराभव झाला, तर तुलनेने नवख्या चेहऱ्यांनी बाजी मारली. दरम्यान यंदाच्या महापालिकेच्या सभागृहात 64 नवे चेहरे प्रवेश करणार आहेत.**

प्रभाग ८ मध्ये भाजपमधून राष्ट्रवादीत गेलेल्या सीमा सावळे यांना भाजपच्या डॉ. सुहास कांबळे यांनी धक्का दिला. याच प्रभागातून भाजपचेच स्थायी समितीचे माजी अध्यक्ष विलास मडिगेरी यांना राष्ट्रवादीच्या तुषार शहाणे यांनी कात्रजचा घाट दाखवला.

प्रभाग १६ मधून राष्ट्रवादीचे मातब्बर नेते मोरेश्वर भोंडवे यांना शिंदेसेनेचे शहरप्रमुख नीलेश तरस यांनी धूळ चारली. प्रभाग २० मध्येही लक्षणीय उलथापालथ झाली. राष्ट्रवादी (शरद पवार) च्या सुलक्षणा धर यांचा पराभव करून राष्ट्रवादी (अजित पवार) चे जितेंद्र ननावरे यांनी मागील उट्टे काढले. याच प्रभागात राष्ट्रवादीच्या नवख्याV वर्षा जगताप यांनी भाजपच्या महिला शहराध्यक्षा सुजाता पालांडे यांच्यावर विजय मिळवला.






#### शेवटच्या फेरीपर्यंत चुरस

सर्वांत जाएंट किलर ठरल्या प्रभाग २१ मधील राष्ट्रवादीच्या प्रियंका कुदळे. भाजपच्या माजी स्थायी समिती अध्यक्षा उषा वाघेरे यांना त्यांनी धूळ चारली. प्रभाग ३२मध्ये दोघा स्थायी समितीच्या माजी अध्यक्षांची लढत झाली. त्यात राष्ट्रवादीच्या अतुल शितोळे यांच्यावर भाजपच्या प्रशांत शितोळेंनी बाजी मारली. या प्रभागातील धक्कादायक निकालाबाबत दिवसभर चर्चा सुरू होती.

#### ६४ नवे चेहरे सभागृहात

१२८ जागांपैकी ६४ नवे चेहरे निवडून आले आहेत. तर, ६४ जुने नगरसेवक पुन्हा सभागृहात आले आहेत. भाजपचे ४३, राष्ट्रवादीचे १७, शिंदे गटाचे ४ यांना जनतेने संधी दिली आहे. भाजपचे सोनम मोरे, सुजाता बोराटे, निखिल बोऱ्हाडे, सारिका गायकवाड, अर्चना सस्ते, सचिन तापकीर, श्रुती डोळस, उदय गायकवाड, कृष्णा सुरकुले, कविता भोंगाळे, रेखा देवकर, राजश्री लांडगे, योगेश लांडगे, राणी पठारे, सुहास कांबळे, सुप्रिया चांदगुडे, कुशाग्र कदम, रिटा सानप, नीलेश नेवाळे, शीतल वर्णेकर, शिवानी नरळे, अनिल घोलप, अर्चना करांडे, कैलास कुटे, धर्मपाल तंतरपाळे, पल्लवी वाल्हेकर, मनीषा चिंचवडे, मधुरा शिंदे, मंदार देशपांडे, कोमल काळे, तानाजी बारणे, कुणाल वाव्हळकर, रेश्मा भुजबळ, श्रुती वाकडकर, स्नेहा कलाटे, अर्चना तापकीर, अनिता काटे, कुंदा भिसे, रविना आगोळकर, श्याम जगताप, ज्ञानेश्वर जगताप, पल्लवी जगताप, तृप्ती कांबळे हे पहिल्यांदाच निवडून आले आहेत. राष्ट्रवादीचे विकास साने, यश साने, विराज लांडे, अश्विनी वाबळे, तुषार सहाने, सिद्धार्थ बनसोडे, सारिका मासूळकर, अरुणा लंगोटे, शेखर चिंचवडे, मनीषा लांडे, वर्षा जगताप, प्रियांका कुदळे, सागर कोकणे, योगिता बारणे, प्रतीक्षा लांघी, दीप्ती कांबळे, उज्ज्वला ढोरे आणि शिंदे गटाचे ऐश्वर्या तरस, रेश्मा कातळे, नीलेश तरस, विश्वजीत बारणे यांना पहिल्यांदाच संधी मिळाली आहे

## पालिकेकडून कंत्राटी महिला कामगारांना रात्रीच्या वेळी सफाई कामातून दिलासा

### महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची स्थायी समितीच्या बैठकीमध्ये मान्यता

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**रात्रीच्या वेळी रस्ते सफाई व कचरा संकलनाचे काम लावल्यामुळे कंत्राटी महिला सफाई कामगारांना होणाऱ्या त्रासाबाबत तक्रारी प्राप्त झाल्यानंतर अखेर महापालिका प्रशासनाने निर्णयात बदल केला आहे.**

नव्या निर्णयानुसार आता शहरातील निम्म्या भागात दिवसा आणि निम्म्या भागात रात्री साफसफाईचे काम केले जाणार आहे. यामुळे कंत्राटी महिला कामगारांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत कंत्राटी पद्धतीने रस्ते सफाई व कचरा संकलनाचे




काम केले जाते. या कामात मोठ्या प्रमाणावर महिला कामगार कार्यरत आहेत. यापूर्वी दिवसा सुरू केले जाणारे साफसफाईचे काम अचानक रात्री करण्याचे आदेश दिले होते. यामुळे महिला कामगारांमध्ये तीव्र नाराजी पसरली होती.

#### लेखी संमती दिल्यास

#### रात्रपाळीचे काम

महापालिकेने सरसकट रात्रपाळी रद्द करून शहरातील सर्व प्रभागांत ५० टक्के काम दिवसा आणि ५० टक्के काम रात्री करण्याचा निर्णय घेतला आहे, तसेच रात्रपाळीत महिला कामगारांकडून काम करून घेण्यापूर्वी त्यांची लेखी संमती घेण्यात येईल., संमती असलेल्या महिलांनाच रात्रपाळीचे काम देण्यात येईल, अशी माहिती उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी दिली.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046